ISSN NO. 2231-4059 (PRINT)


UGC Care Group –1 Journal

# भाषा आणि जीवन

(विशेषांक)

वर्ष— ३१ संख्या —०४

ऑक्टोबर — डिसेंबर २०२१



# भाषा आणि जीवन

वर्ष – ३९ संख्या – ०४
ऑक्टोबर – डिसेंबर २०२१

ISSN NO. 2231- 4059 (PRINT)

(UGC Care Group-1)

मराठी अभ्यास परिषद
आनंदनगर, पुणे ४११०५१

| | | |
|---|---|---|
| 17. | समाजशस्त्रातील ज्ञानार्जनाचे स्त्रोत : एक चिकीत्सा | डॉ. ओमप्रकाश आष्टनकर |
| 18. | विदर्भ राज्याची मागणी व जनतेची भूमिका | डॉ. रायन त्र्यं. महाजन<br>डॉ. संदीप तुंडूरवार<br>डॉ. शरद सांबारे |
| 19. | भारतीय तत्वज्ञानातील ज्ञानाचे स्त्रोत | प्रा.डॉ.शींडगे विजय सोपानराव |
| 20. | न्यायदर्शनातील अनुमान प्रमाण-स्वरुप व प्रकार | प्रा.सौ.जयश्री तांबे |
| 21. | ज्ञानाच्या स्त्रोतात जैन दर्शनातील अनुमान प्रमाणाचे महतवपूर्ण योगदान | प्रा. वर्षा जपे |
| 22. | वैयक्तिक आणि सामाजिक स्तरावरील पर्यावरणविषयक उपक्रमाचा अभ्यास | डॉ.महादेव विष्णू मत<br>श्रीमती शिवकन्या निवृत्तीराव कदेरकर |
| 23. | समाजसुधारक संतश्री गाडगे महाराज | प्रा. योगेश मारोती करवाडे |
| 24. | संगीत उपासनेचा मानवी जीवनावर होणारा सकारत्मक परिणाम | प्रा. वैखरी वझलवार |
| 25. | 'भारतीय दर्शनातील शब्द प्रमाण' | डॉ. नरेंद्र वसंतराव रघटाटे |
| 26. | ज्ञानशास्त्र.. एक आव्हान | प्रा.रजनी आनंदराव काळे |

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

निसर्ग आणि विश्वाच्या आकलनासाठीचा शोध म्हणजे तत्वज्ञान. तत्वज्ञानाच्या अनेक शाखा आहेत तत्वमिमांसा, ज्ञानमिमांसा इ. तसेच तत्वज्ञानाशी संबंधित अनेक क्षेत्रे आहेत शैक्षणिक तत्वज्ञान, सामाजिक तत्वज्ञान, राजनैतिक तत्वज्ञान, आर्थिक तत्वज्ञान इ. विविध तत्वज्ञान विषयक विषयक उपागम आहेत दृ जसे की, आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद, भौतिकवाद आणि इतर.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ज्ञानशास्त्र हे आजही आधुनिक युगामध्ये किती आव्हानात्मक आहे. असे सांगण्याच्या प्रयत्न केलेला आहे.

ज्ञान कशासाठी? याचे उत्तर आपणास 'र्सवकष प्रबोधनासाठी!' असे देता आले पाहिजे पाहिजे. भारतात अजूनही अद्यापि प्रबोधनाची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने प्रबोधनाकडे नेणारे नवे ज्ञानशास्त्र रचले गेले पाहिजे. ज्ञान व माहिती यात नेमका विवेक करून ज्ञानाचे प्रेम विकसित करणाऱ्या शिक्षण क्षेत्राची रचना करणे गरजेचे आहे. ज्ञान म्हणजे काय? हा प्रश्न प्राचीन भारतीय आणि प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी उपस्थित केला आणि विविध सिद्धांत मांडले. त्यांचा स्वतंत्र अभ्यास सखोलपणे करता येतो.

मानवी ज्ञानाचे स्वरूप, त्याची व्याप्ती, त्याला असलेल्या मर्यादा, प्रामाण्याचे निकष, ज्ञानाचा आणि समग्र अस्तित्वाचा संबंध या प्रश्नांचा विचार तत्त्वज्ञानाच्या ज्ञानशास्त्र या शाखेत केला जातो. ज्ञानाची साधने कोणती, ज्ञानाचे स्वरूप काय? ज्ञानाचा निकष कोणता? यथार्थ आणि अयथार्थ ज्ञानातील नेमका फरक काय? पुढे जाऊन 'आपण जाणतो हे कसे जाणतो? म्हणजे एखाद्या गोष्टीचे ज्ञान होते, याचे ज्ञान कसे होते?' याचा विचार ज्ञानशास्त्रात होतो. ज्ञान ही मानवी संकल्पना असली तरी ती ईश्वरालाही लागू केली जाते. ईश्वर परम प्रज्ञानी मानला जातो. अर्थात ही सुद्धा मानवी धारणा असते.

ज्ञानशास्त्र ही ज्ञानविषयक समस्यांचा अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे. इंग्लिशमधील एपिस्टेमॉलॉजी (Epistemology) या संज्ञेचे भाषांतर म्हणून ज्ञानशास्त्र ही संज्ञा उपयोगात आणली जाते. एपिस्टेमॉलॉजी ही संज्ञा जेम्स फेरिएर (1808–1864) या स्कॉटिश तत्त्ववेत्त्याने प्रथम सुव्यवस्थितपणे प्रचारात आणली. ग्रीक भाषेतील मचपेजमउम म्हणजे ज्ञान आणि' स्वहवे म्हणजे शास्त्र. म्हणून Epistemology चा अर्थ ज्ञानशास्त्र.

प्राथमिक पातळीवर ज्ञानशास्त्र, मानवी ज्ञानाचे वर्णन आणि मूल्यमापन करताना दिसते. त्यात ज्ञान, भ्रम, प्रत्यक्ष ज्ञान, अनुमान, प्रतीती, विधान, सत्य इत्यादी संकल्पनांचे विश्लेषण करते. त्याचप्रमाणे या संकल्पनांचा आशय स्पष्ट करणे, त्यांचा परस्परसंबंध निश्चित करणे असे कार्यही करते. दुसऱ्या पातळीवर विविध विज्ञानांचे स्वरूप, त्यांची ज्ञानविषयक उद्दिष्टे आणि विषय यांनुसार त्या त्या विज्ञानाची पद्धती आणि एकूण विज्ञान या ज्ञानरचनेची सामान्य पद्धती, तिचे प्रामाण्याचे निकष निश्चित करणे, हे काम करते. तिसरे म्हणजे, एखाद्या प्रस्थापित विज्ञानाच्या पद्धती व उद्दिष्टात गरजेनुसार बदल करणे, आणि वेगवेगळ्या विज्ञानांची गृहीतकृत्ये, त्यांच्या पद्धतीचा आधार असलेल्या मूलभूत संकल्पनांचा परस्परसंबंध स्पष्ट करून त्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करणे, हेही काम ज्ञानशास्त्र करते. त्यामुळे विविध विज्ञानांची एक सुसंगत व्यवस्था लागते. साहजिकच विज्ञान म्हणजे सुव्यवस्थित ज्ञान, अशी व्याख्या तयार होते. 'ज्ञान' या संकल्पनेचा अभ्यास का करावयाचा? नाही केला तर काय बिघडते? असेही प्रश्न निर्माण झालेत. त्यासाठी 'जाणणे' आणि मत, विश्वास, श्रद्धा, समज होणे आणि अंदाज, ठोकताळे यांतील नेमका फरक स्पष्ट करण्याची क्षमता

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

शरणागती पत्करायला लावून त्यांच्या मानगुटीवर परतत्त्वाचे भूत बसविले जाते. न्याय – सांख्य, योग–वैशेषिक यांच्याबाबतीत असे दिसते.

(4) माहिती आणि ज्ञान यांतील फरकाचेच ज्ञान नसल्याने समाजात ज्ञानाबद्दलची आसक्ती वाढू शकत नाही.

(5) ज्ञान व ज्ञानी माणसाला मूल्यच नसल्याने भारतीय प्रबोधन अपुरे राहिले आहे.

दुसरीकडे समाज शहाणा व्हावा, ही संत ज्ञानेश्वर ते गाडगे महाराज, तुकडोजी महाराज यांची परंपरा ही सामाजिक व राजकीय ज्ञानातून लाभणाऱ्या शहाणपणाची गोष्ट आहे. पण संतांचेही लोक ऐकत नाहीत, हे सिद्ध झाले आहे. अन्यथा 'वारकऱ्यांची यादवी' लिहिण्याची वेळ आली नसती. आणि संतांचे वंशज असल्याचा दावा करणाऱ्यांकडून संतटीकेवर बंदी घालण्याची अवैज्ञानिक मागणी झाली नसती. ज्यांनी वैज्ञानिक तत्त्वज्ञानाचा उदय भारतात कसा होईल, हे पाहिले पाहिजेय त्यांनी विज्ञान, वैज्ञानिक दृष्टी कशी मरेल, संतांचे सामाजिक प्रबोधन कसे रसातळाला जाईल, याकडे लक्ष द्यावे, हे भारतीय जनतेचे केवळ दुर्दैव आहे. नव्हे, हा तर कलियुगीन महिमा म्हणावा, असा वैदिक नियतीवादी सटवाईचा लेख म्हणावा लागेल. म्हणूनच ज्ञानाला मूल्य देणारे नवे इहवादी ज्ञानशास्त्र रचणे आणि त्यावर आधारित शिक्षणव्यवस्था अमलात आणणे हा नवप्रबोधनाचा अजेंडा असला पाहिजे. तुकोबांचा 'बुडती हे जन न देखावे डोळा' हा अनंत कारुण्यभाव हे त्याचे अधिष्ठान असावे. अश्या रीतीने ज्ञान हे प्रबोधनासाठी एक आव्हानच ठरते.

**संदर्भ ग्रंथ सुची**

1) पाश्चात्य तत्वज्ञानाचा इतिहास 1 **डॉ. ग.ना. जोशी**
2) ग्रीक एवम मध्य युगी दर्शन का वैज्ञानिक इतिहास **जगदिश श्रीवास्तव**
3) पाश्चात्य दर्शन **चंद्रधर शर्मा**
4) ग्रीक एवम मध्यकालीन दर्शन **डॉ. सी.एल. त्रिपाठी**
5) पाश्चात्य दर्शन का समीक्षात्मक विश्लेषण **बी.आर जाटव**
6) धर्मांचे तत्वज्ञान **प्रा. निगळ, प्रा. फापाळे**
7) तत्वज्ञानाची मुलभूत समस्या **दि.य. देशपांडे**